ज्योतिषविषयक
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८३ वा | शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सोलापूरात 'स्वीकृत'वरून प्रचंड गोंधळ; विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना धरले धारेवर

## नाव कट झालेल्या भाजप इच्छुकाचा आत्महत्येचा इशारा, अमोल शिंदेंना मेसेज

## 25 लाख देऊन राष्ट्रवादी नगरसेवकाला फोडले

## स्वीकृत नगरसेवक निवडीविरोधात विरोधक कोर्टात जाणार







**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत स्वीकृत नगरसेवकांच्या यादीवरून प्रचंड गोंधळ झाला. भारतीय जनता पक्षाकडून नऊपैकी आठच नावे जाहीर केल्याने त्यावर शिवसेना आणि काँग्रेस पक्षाने आक्षेप घेत महापौरांच्या आसनासमोर गोंधळ घातला.

या गोंधळातच पहिलीच सर्वसाधारण सभा तहकूब करण्याची वेळ भाजपवर आली.

दरम्यान, स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छूक असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या एका इच्छुकाने मला मेसेज केला आहे. त्याने बालाजी सरोवर येथे असलेल्या काही नेत्यांची, काही आमदाराचं नाव लिहून आत्महत्या करण्याची धमकी दिली आहे, अशी धक्कादायक माहिती शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी सभागृहात दिली, त्यामुळे पहिल्याच सभेत मोठी खळबळ उडाली आहे.

भारतीय जनता पक्षाने नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत १०२ जागांपैकी ८७ जागा जिंकल्या आहेत, त्यामुळे स्वीकृत सदस्यांच्या भाजपच्या वाट्याला नऊ जागा आल्या होत्या. या नऊ जागांवर भाजपने नावे घोषित करणे अपेक्षित होते. मात्र, भाजपने केवळ आठ नावांची घोषणा करून कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न केला.

त्यावर शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी आक्षेप घेतला. भाजपने ९ पैकी ९ नावे आजच घोषित करावी, अशी मागणी अमोल शिंदे आणि काँग्रेसचे नगरसेवक तथा शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी केली. मात्र, भाजपकडून पुढच्या सभेत नाव घेणार, अशी भूमिका घेतली आहे. याच मुद्यावरून काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक महापौरांच्या व्यासपीठाकडे धावून गेले.

महापौर विनायक कोंड्याल हे सभेचे कामकाज करत असताना अमोल शिंदे आणि चेतन नरोटे यांनी महापौरांच्या व्यासपीठावर हात आदळत आक्रमक भूमिका मांडली. विरोधकांचा गोंधळ पाहून महापौर विनायक कोंड्याल सभा तहकूब करत कामकाज स्थगित केले. त्यामुळेही विरोधकांनी तीव्र नापसंती व्यक्त केली.

शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे म्हणाले, भाजपचे लोक सभागृह चालवू शकत नाहीत. सभागृह नेते नरेंद्र काळे हे तर शिस्तीचे धडे सांगतात. स्वीकृत नगरसेवकपदासाठी ज्यांनी भारतीय जनता पक्षाचा अर्ज भरला आहे, त्या इच्छुकाचा मला मेसेज आला आहे. आज बालाजी सरोवरमध्ये असलेल्या काही नेत्यांचं आणि आमदारांचं नाव लिहून आत्महत्या करणार आहे, असा मेसेज मला आला आहे, तो मी सभागृहात सांगितलेला आहे. सभागृहात तुम्ही नाव कट केले आहे, ते कोणाचे नाव आहे, अशी मी विचारणा केली. हे कळाल्यानंतर भाजपचे महापौर आणि इतरांवर पळ काढायची वेळ आली आहे. ह्याच्या कार्यकर्त्याला आत्महत्या करतो म्हटल्यानंतर पळून गेलेले आहेत.

भाजपमध्ये कोण पक्ष वाढवत आहे, कोणी पक्षाला मोठं केलं आहे आणि आज मलई कोण खातंय, हे सगळ्यांना माहिती आहे. मी आज ते नाव जाहीर करू शकतो. ते दररोज तुम्हालाही भेटतात. त्यांनी आत्महत्या करण्याची धमकी दिली आहे, असेही शिवसेनेचे नगरसेवक शिंदे यांनी नमूद केले आहे.

सोलापूर महापालिकेच्या १०२ जागांपैकी भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक कामगिरी करत तब्बल ८७ जागा जिंकल्या आहेत. त्यांच्यासोबत राष्ट्रवादी गेल्यानेत त्यांच्या सभागृहात महापालिकेत दहा जागा स्वीकृत नगरसेवक म्हणून भरता येणार होत्या. त्या १० जागांसाठी भाजप आणि एमआयएम पक्षाकडून तब्बल ६२ अर्ज आले होते.

भाजपच्या वाट्याला नऊ, तर एमआयएमला संख्याबळाच्या आधारे एक जागा मिळणार होती. त्यानुसार आज महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत दहा जणांची नावे जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र, केवळ नऊजणांची नावे या सभेत जाहीर झाली. त्यामुळे शिवसेना आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी सर्वच नावे जाहीर करण्याच्या मागणीवरून गोंधळ घातला, त्यामुळे भाजपला कामकाज तहकूब करावे लागले.

### एमआयएमकडून नय्यूम सालारांना संधी

एमआयएमकडून नय्यूम सालार यांना पक्षाने संधी दिली आहे. त्यांना एमआयएम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी निवडणुकीच्या काळातच शब्द दिला होता, त्यानुसार एमआयएमकडून सालार यांची नियुक्ती स्वीकृत नगरसेवकपदी करण्यात आली आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांनी सभागृह तहकूब केले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना अमोल शिंदे यांनी भाजपवर मोठा आरोप केला. भाजपने चालबाजी करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकाला २५ लाख रुपये देऊन आपल्या बाजूला वळविले, असा गंभीर आरोप केला आहे.

शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे म्हणाले, भारतीय जनता पक्षाने कालच चालबाजी करून वैभव हत्तुरे यांना २५ लाख रुपये देऊन त्यांची नगरसेवकांची संख्या ८८ वर नेली, त्यामुळे भाजपच्या वाट्याला स्वीकृत नगरसेवकाच्या नऊ जागा आल्या. मात्र, भाजपने त्या सर्व नऊ जागा जाहीर करण्याऐवजी केवळ सातच नावं जाहीर केली आहेत, असा दावाही शिंदे यांनी केला.

सोलापूर महापालिका निवडणुकीत भाजपचे ८७ नगरसेवक आहेत. त्यांना वाटत होतं की आपल्याला सातच जागा मिळतील, पण नगरसेवक वैभव हत्तुरे यांना २५ लाख रुपये देऊन त्यांचा पाठिंबा घेतला. वास्तविक ते भाजप उमेदवाराच्या विरोधात लढले, त्या ठिकाणी भाजप उमेदवाराचा पराभव करून ते निवडून आले आहेत. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी त्यांना गाडीत घेऊन गेले. आमदारांपाशी बसवले. त्या ठिकाणी पैशाची थैली मिळाल्यावरच मग ते त्यांच्यासोबत गेले. ठीक आहे, कोणी कुठे जायचे याचा प्रत्येकाला अधिकार आहे, असेही शिंदे यांनी नमूद केले आहे.

ते म्हणाले, सोलापूर शहराचे प्रश्न मांडायला आम्हाला जनतेने महापालिकेत पाठविले आहे, त्या भूमिकेवर आम्ही ठाम राहू. आम्ही कोणत्याही सदस्याला सोबत आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. आम्ही निवडणुकीत जरी राष्ट्रवादीसोबत एकत्र असलो तरी आमच्या चार सदस्यांवर आम्हाला स्वीकृत मिळत नव्हतं, हे आम्हाला माहिती होतं. त्यामुळे आम्ही कोणालाही सोबत घेण्याचा प्रयत्न केलेला नाही.

नगरसेवक शिंदे म्हणाले, आमच्या म्हणण्यानुसार सातच नावं अंतिम आहेत. आठवं आणि नववं नाव जेव्हा येईल, तेव्हा आम्ही कोर्टात जाऊ. आज जी नावं वाचली आहे, तीच नावं फायनल असतील. परिवहन समितीची नावे त्यांना जाहीर करता आली नाहीत, असाही दावा शिंदे यांनी केला आहे.

> भारतीय जनता पक्षाकडून शहराध्यक्ष रोहिणी तडळवकर, रुद्रेक्ष बोरामणी, ज्ञानेश्वर म्याकल, श्रीनिवास दायमा, अक्षय अंजिखाने ह्यांना भाजप आणि संघ परिवारातील निष्ठावंतांना संधी देण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांपासून पक्षासोबत असलेल्या वृषाली चालुक्य आणि मोची समाजातील ऋषिकेश म्हेत्रे, तसेच माध्यम प्रतिनिधी म्हणून मनीष केत यांनाही भाजपनेही स्वीकृत नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी दिली आहे.

# आ रोहित पवार यांच्या जीवाला धोका?

## तात्काळ Z+ सुरक्षा देण्याची राज्य सरकारकडे मागणी



**मागणीचे प्रमुख मुद्दे :**

- संबंधित विमान दुर्घटनेची आंतरराष्ट्रीय एजन्सीकडून सखोल चौकशी करण्यात यावी.
- दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी.
- नवी दिल्लीस्थित खासगी चार्टर कंपनी VSR Ventures वर तात्काळ बंदी घालण्यात यावी.
- राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार रोहित पवार यांना तात्काळ Z+ सुरक्षा द्यावी.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा आमदार रोहित पवार यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त करत त्यांना तातडीनें + सुरक्षा पुरवण्यात यावी, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) व युवा सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने करण्यात आली आहे.

अजितदादा पवार यांच्या कथित विमान दुर्घटनेबाबत राज्यातील जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंकांवर आमदार रोहित पवार सातत्याने पत्रकार परिषदांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करत आहेत. ही दुर्घटना नसून सुनियोजित कट असू शकतो, असा संशय व्यक्त करत त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. जर या प्रकरणात प्रभावशाली घटक सहभागी असतील, तर त्यांच्याकडून आमदार पवार यांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली.

यासंदर्भात सोलापुरात निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मागणी सादर करण्यात आली. हा अत्यंत संवेदनशील विषय असून सुरक्षा पुरवण्याचे अधिकार राज्य सरकारकडे आहेत. तुमचे निवेदन तात्काळ शासनाकडे पाठवण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

'लोकशाहीत लोकप्रतिनिधींना मोकळेपणाने मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. जर सत्य मांडल्यामुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण होत असेल, तर ही लोकशाहीसाठी गंभीर बाब आहे,' असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, युवा सेनेचे उपसचिव रणजीत बागल, डॉ. योगेश रणदिवे, प्रशांत गायकवाड, मुसा आत्तार, अजित पात्रे, अमित मोतेवार, मिलिंद गोरे, मोहित निकम, अमरसिंह खांडेकर, युनुस अत्तार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील २९३ पाझर तलावांचे काम पूर्ण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील वर्षभरात ० ते १००, १०१ ते २५० व २५१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ५७५ पाझर तलावांपैकी २९३ प्रकल्पांचे काम पूर्ण झाले आहे. यातून ७८ हजार ७७४ सहस्त्र घनमीटर (सघमी) पाणीसाठ्यात वाढ झाली असून १७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

उर्वरित २८२ प्रकल्पांचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येणार असून त्यातून १५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पांवर आतापर्यंत ७ कोटी ४९ लाख रुपये खर्च झाला आहे.

शासन योजनेतून ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले १५ तर १०१ ते २५० हेक्टरपर्यंतचे ३४ तलाव पूर्ण झाले आहेत. यातून ६ हजार ११६ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे. या प्रकल्पांच्या पूर्णत्वामुळे २५ हजार ७८२ सघमी पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले १६ तर २५१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले ४३ तलावांचे काम प्रगतिपथावर आहे. यातून १३०९ हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आहे.

१७ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ८२५६ सघमी पाणीसाठ्यात वाढ होणार आहे. महामंडळ योजनेतून ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले १७२ प्रकल्प तर १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेले ४३, असे एकूण २१५ प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या पूर्णत्वामुळे ४६ हजार ६९ सघमी पाणीसाठ्यात वाढ झाली असून ९ हजार २७७ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे. ० ते १०० हेक्टर क्षमता असलेले २०५, १०१ ते २५० क्षमतेचे ३४ तर २५१ ते ६०० क्षमतेच्या एका प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. हे २४० प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर १३ हजार २५ हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ होणार असून ६५ हजार ३०१ सघमी पाणीसाठा वाढणार आहे.

### नियोजनमधून निधी मिळालेले २९ प्रकल्प पूर्ण

नियोजन समितीमधून ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले २५ प्रकल्प तर १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेले ४, असे एकूण २९ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यातून पाणीसाठ्यात ६ हजार ९२३ सघमी वाढ झाली आहे. यामुळे १ हजार ६१८ हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे. ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या २३ तर १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या २, अशा एकूण २५ प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे १०७६ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार | SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार | SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL | HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- | SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# दहावी परीक्षेला सुरुवात; पहिल्या दिवशी मराठी विषयाचा पेपर शांततेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेला गुरुवारी सुरुवात झाली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी प्रथम भाषा मराठीचा पेपर पार पडला. सोलापूर जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर परीक्षा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडल्याचे चित्र दिसून आले.

जिल्ह्यातील एकूण १५ परीक्षा केंद्रांवर ६१ हजार ९६५ विद्यार्थ्यांची नोंदणी होती. यापैकी ६० हजार ७१६ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, तर १ हजार २४९ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती शिक्षण मंडळाच्या उपस्थिती तक्त्यातून समोर आली आहे.

सर्वाधिक उपस्थिती अक्कलकोट तालुक्यातील सिद्धेश्वर माने विद्यालय केंद्रावर नोंदविण्यात आली असून येथे ५ हजार ९१६ विद्यार्थी उपस्थित होते. त्याठिकाणी १२३ विद्यार्थी गैरहजर राहिले. तसेच बार्शी, माढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ आदी तालुक्यांतील केंद्रांवरही मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

सोलापूर शहरातील गणपती घाट, विजापूर रोड, हायस्कूल परिसर, न्यू इंग्लिश स्कूल, छत्रपती शिवाजी हायस्कूल, भारती विद्यापीठ आदी केंद्रांवर परीक्षेची सुरळीत अंमलबजावणी करण्यात आली. बहुतांश केंद्रांवर गैरहजेरीचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून आले.

परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, भरारी पथके, तसेच कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले. कुठेही अनुचित प्रकार घडल्याची नोंद नाही. मराठी विषयाचा प्रश्नपत्रिका स्तर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार व अपेक्षित स्वरूपाची असल्याची प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली.

दरम्यान, पुढील विषयांच्या परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसार पार पडणार असून शिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उमराणी बंधाऱ्यात पाणी अडवल्याने भीमा नदी कोरडी

## दक्षिण सोलापूरमध्ये शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर



अधीक्षक अभियंता, लघुक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा), सोलापूर यांना निवेदन देत उजनीतून सोडलेले पाणी टेलएंडपर्यंत पोहोचवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दरवर्षीप्रमाणे पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी उजनी धरण येथून भीमा नदी पात्रात पाणी सोडले जाते. मात्र चालू वर्षी वेळेत पाणी न सोडल्यामुळे मंगळवेढा, पंढरपूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर व अक्कलकोट तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. वेळेत पाणी न मिळाल्यास उभे पीक जळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकऱ्यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याशी संपर्क साधून आपली समस्या मांडली होती. त्यानंतर खासदार प्रणिती शिंदे यांनी १४ फेब्रुवारी २०२६ रोजी

या मागणीनुसार उजनीतून पाणी सोडण्यात आले. मात्र कर्नाटक सरकारने उमराणी बंधारा याची उंची वाढवल्यामुळे उजनीतून सोडलेले पाणी तेथेच अडविले गेले आणि सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी पूर्णतः कोरडी पडली. याचा गंभीर परिणाम दक्षिण सोलापूर तालुक्यावर झाला असून लवंगी, कारकल, औज, कुरघोट, टाकळी, बरूर आदी गावांपर्यंत उजनीचे पाणी पोहोचले नाही. तसेच मंद्रूपसह एकूण आठ गावांचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही बंद झाला.

या परिस्थितीमुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेती संकटात सापडली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. पाण्याअभावी शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले असून, अनेक ग्रामस्थांनी ही बाब पुन्हा खासदार प्रणिती शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आज रोजी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी मोबाईलद्वारे तातडीने संपर्क साधून हस्तक्षेप केला. प्रशासनाने कर्नाटकातील संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधल्यानंतर उमराणी बंधाऱ्यात अडविलेले पाणी सोडण्यात आले असून, भीमा नदीत पुन्हा प्रवाह सुरू झाला आहे.

पाणी सोडण्यात आल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, टेलएंडपर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी प्रशासनाकडून पुढील नियोजन सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## संपादकीय

# भेसळ अन्नात की व्यवस्थेत?

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील कारकून राजेंद्र ढेरंगे याला ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. ही बातमी खरे तर संबंधित व्यक्तीला मंत्र्याच्या कार्यालयातून अटक झाल्यानेच अनेकांना महत्त्वाची वाटली असावी; अन्यथा भ्रष्टाचार आता सर्वसामान्यांच्याही अंगवळणी इतका पडला आहे व त्याचे दररोजच्या आयुष्यात जे अवाढव्य आकडे ऐकण्यास मिळतात ते पाहता, ३५ हजार रुपयांची लाच, तीही मंत्र्यांच्या मंत्रालयातील कार्यालयात घेतली जाते, हे कुणी सांगितले असते तर ती लोणकढी थापच वाटली असती. यावर नेहमीप्रमाणे हाताच्या बोटावर मोजण्याइतके दिवसही चर्चा होणार नाही. शिवाय मंत्र्यांनी या लाचखोरीशी माझा काही संबंध नाही, असे म्हणत हात झटकलेलेच आहेत.

सामान्य माणसाने सिग्नल पिवळा असताना दुचाकी पुढे नेल्यास वाहतूक पोलिसाबरोबर हुज्जत घालताना लावलेल्या तकार्पेक्षाही बालिश तर्क मंत्रिमहोदय देत असले तरी त्यात त्यांची फारशी चूक नाही; कारण आपल्या समाजात समज आल्यापासूनच प्रत्येकाला भ्रष्ट व्यवस्थेत जगण्याचे धडे मिळत असतात. झिरवळ यांच्याकडे जे खाते आहे, ते प्रामुख्याने नागरिक ज्या खाद्यपदार्थांचे सेवन करतात वा आजारपणातून बरे होण्यासाठी जी औषधे घेतात, त्यात भेसळ होऊ नये, ती होत असल्यास थांबावी यासाठी काम करते. आता या खात्यात एखादा कारकून लाच घेतच असेल तर त्या लाचेमागील अंतिम ध्येय काय असेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

राज कपूर यांनी 'जागते रहो' व 'श्री ४२०' या चित्रपटांतून अन्न व औषधातील भेसळीच्या विरोधात ताशेरे ओढले होते. 'जागते रहो'मध्ये तर औषधामधील भेसळीमुळे अनेकांचा कसा मृत्यू होतो हे दाखवले आहे. याचा अर्थ साठच्या दशकात भेसळ होत नव्हती, असे नाही, मात्र समाजात त्याच्या विरोधात प्रचंड चीड होती. भेसळ करणारा सिनेमात खलनायक म्हणून समोर येत होता. मात्र, आता 'धूम'सारख्या सिनेमांतून चोरच नायक झाल्याचा काळ आहे.

या पार्श्वभूमीवर संसदीय लोकशाहीचे धडे ज्या ब्रिटिशांकडून आपण शिकलो, त्या देशांमध्ये अलीकडेच घडलेल्या काही घटनांची तुलना आपल्याकडील नैतिकतेच्या नावाखाली सुरू असलेल्या व्यवहारांशी करणे गरजेचे आहे. सध्या जगभरात एप्स्टीन फाइल्स हे प्रकरण गाजत आहे. ब्रिटनचे माजी कामगार मंत्री पीटर मॅन्डलसन यांनी या एप्स्टीन महाशयांना देशाच्या काही व्यापारविषयक गुप्त गोष्टी सांगितल्याचा संशय आहे. मेन्डलसन यांच्यावर कोणताही बाल लैंगिक शोषणाचा आरोप नाही. तरीही त्यांना हाउस ऑफ लॉर्ड्स म्हणजे वरिष्ठ सभागृहाचा राजीनामा द्यावा लागलाच. शिवाय लॉर्ड हे संबोधनही स्टार्मर सरकारने काढून घेतले. शिवाय मॅन्डलसन यांची ब्रिटनचे अमेरिकेतील राजदूत म्हणून नेमणूक केल्याबद्दल पंतप्रधान स्टार्मर यांना जनतेची माफी मागावी लागली. दुसरी साधीशी घटना काही दिवसांपूर्वीच घडली.

लंडनच्या हिथ्रो विमानतळावरून एअर इंडियाचे विमान मुंबईसाठी उड्डाण करणार होते. मात्र, उड्डाणापूर्वी त्या विमानाचा इंधन खटका चालत नसल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. त्याने दोन तीनदा प्रयत्न केल्यावर तो सुरू झाला. विमान लंडनहून मुंबईस सुखरूप पोहोचले. इथे आल्यावर वैमानिकाने ही गोष्ट संबंधित अधिकाऱ्यांस सांगितल्यावर त्याची छोटी बातमी काही वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यावर ब्रिटनच्या नागरी हवाई उड्डाण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एअर इंडियास नोटीस बजावली आहे. आपल्याकडे राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा मृत्यू ज्या विमान कंपनीच्या विमानात झाला त्या कंपनीला युरोपातील २९ देशांत विमानांची तपासणी करण्यास नकार दिल्यामुळे उड्डाण करण्यास बंदी घातलेली आहे, हे या पार्श्वभूमीवर अधिकच अधोरेखित होते.

वरील घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते, की पाश्चिमात्य देशांमधील लोकशाहीत त्रुटी नाहीत, असे नाही. मात्र, तेथील समाजाचे अधःपतन हे आपल्याइतके वेगाने झालेले नाही. तेथील राज्यकर्ते व प्रशासकीय यंत्रणांना सामाजिक नैतिकतेची चाड आहे. जनतेच्या रोषाची भीती आहे. आपल्याकडे मात्र भ्रष्टाचार इतका अंगवळणी पडला आहे, की तो दिल्ली ते गल्ली व मंत्री ते संतरी राजरोस प्रत्येकाला अहोरात्र दिसत असल्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागातील मंत्र्यांच्या दालनातील कारकूनच लाच घेताना पकडला गेला तरी त्याचे कोणालाच काही वाटत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्वतःच्या मंत्रिमंडळाच्या प्रतिमेची चिंता असेल तर त्यांनी झिरवाळ यांना जबाबदारी घ्यायला लावून तत्काळ राजीनामा देण्यास सांगावे. तसे झाले नाही तर 'हमाम मे सभी नंगे है' त्यामुळे काहीच होणार नाही, हे जनतेचे मत अधिकच ठाम होईल!

# पराक्रमी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आपण दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरी करतो. मात्र, या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'हिंदवी स्वराज्य' स्थापनेचे आपले महान ध्येय महाराजांनी कसे साध्य केले, हे जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या राजमुद्रेतील आशयच त्यांच्या ध्येयधोरणांचे सार स्पष्ट करतो—

'प्रतिपच्चंद्रलेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
साहसूनोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते॥'

या राजमुद्रेचा अर्थ असा—प्रतिपदेचा चंद्र जसा कलेनकलेने वाढत जाऊन विश्ववंदनीय होतो, त्याप्रमाणे शहाजींचा पुत्र शिवाजी यांच्या राज्याची कीर्ती वाढत जाईल आणि ही मुद्रा लोककल्याणासाठी तेजाने झळकेल.

राजमुद्रेत 'शहाजींचा पुत्र' असा उल्लेख करून शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे ध्येय आपल्या वडिलांच्या स्वाभिमानी विचारांशी सुसंगत असल्याचे अधोरेखित केले आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी स्वराज्य स्थापनेची मूळ संकल्पना शहाजी राजांची असल्याचे मत व्यक्त केले आहे. शहाजीराजे स्वतंत्र आणि स्वाभिमानी वृत्तीचे होते. निजामशाही वाचवण्यासाठी त्यांनी दिल्लीच्या शहाजहानविरुद्ध लढा दिला होता.



शहाजीराजांनी बाल शिवबासाठी सर्वांगीण शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली. मल्लविद्या, दांडपट्टा, तलवारबाजी, घोडेस्वारी, तिरंदाजी यांसोबतच अक्षरज्ञानही दिले गेले. ह्यशिवभारतह्व या ग्रंथात उल्लेख आहे की, लिपी ग्रहण योग्य वयाचे झाल्यावर शिवाजी राजांना शहाजीराजांनी गुरुच्या स्वाधीन केले. शिवाजी महाराजांच्या काळात राज्यव्यवहारकोश, करणकौस्तुभ इत्यादी ग्रंथांची निर्मिती झाली. विद्वानांचा सन्मान करून त्यांनी ज्ञानपरंपरेला चालना दिली. म्हणूनच मध्ययुगीन काळात सर्वाधिक ग्रंथ निर्मिती छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात झाली.

वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच शिवाजी महाराजांच्या मनात स्वतंत्र राज्याची संकल्पना आकार घेऊ लागली. २८ जानेवारी १६४६ च्या एका न्यायनिवाड्याच्या पत्रावर त्यांची स्वतंत्र राजमुद्रा आढळते. १६४७ मध्ये त्यांनी तोरणा आणि राजगड हे किल्ले जिंकले. पुढे पुरंदर, कोंडाणा (सिंहगड) ताब्यात घेतले. जावळी जिंकून रायगड स्वराज्यात सामील झाला. महाराजांचा उद्देश केवळ प्रदेशविस्तार नव्हता, तर नव्या प्रदेशातील लोकांचा विश्वास संपादन करून त्यांचे कल्याण करणे हा होता.

शिवाजी महाराजांच्या वाढत्या प्रभावामुळे आदिलशाही दरबारात खळबळ उडाली. अफजलखानाने महाराजांना जिवंत पकडण्याचा विडा उचलला; परंतु महाराजांनी आपल्या युक्ती आणि शौर्याच्या बळावर त्याचा पराभव केला. यानंतर स्वराज्याला खऱ्या अर्थाने बळ प्राप्त झाले. जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि अनेक तरुण स्वराज्याच्या सेवेत दाखल झाले.

१६६० मध्ये सिद्दी जोहरने पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला. महाराजांनी चातुर्याने सुटका केली. घोडखिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांनी शौर्याने लढा देत महाराजांची सुटका सुरक्षित केली. पुढे पुण्यातील लाल महालात घुसून शाहिस्तेखानावर धडक कारवाई करण्यात आली. त्यानंतर सुरतेवर छापा टाकून मोगलांना जबर धक्का दिला. महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली.

औरंगजेबाने मिर्झाराजे जयसिंग यांना शिवाजी महाराजांविरुद्ध पाठवले. १३ जून १६६५ रोजी 'पुरंदरचा तह' झाला. शिवाजी महाराजांनी २३ किल्ले मोगलांना दिले. पुढे आग्र्यात औरंगजेबाने त्यांचा अपमान करून नजरकैदेत ठेवले; परंतु महाराजांनी धाडसी सुटका करून महाराष्ट्रात परत येत स्वराज्य पुन्हा उभारले. दिलेले किल्ले पुन्हा जिंकून स्वराज्याची पताका उंचावली.

राज्य स्थिर झाल्यानंतर महाराजांनी प्रशासनिक सुधारणा केल्या. मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो यांच्याकडे शेती व महसूल व्यवस्था सोपवली. शेतकऱ्यांना सवलती दिल्या, पडीत जमिनी लागवडीखाली आणल्या, गरीब शेतकऱ्यांना बियाणे व बैल उपलब्ध करून दिले. रयतेचा विश्वास संपादन करून 'हे राज्य रयतेचे आहे' ही भावना दृढ केली.

६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा भव्य राज्याभिषेक झाला. या घटनेने स्वराज्याला सार्वभौम मान्यता मिळाली आणि एका नवयुगाची सुरुवात झाली.

आज त्यांच्या जयंतीदिनी या महान स्वराज्यसंस्थापकाचा इतिहास अभिमानाने स्मरूया आणि त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याचा संकल्प करूया.

जय भवानी! जय शिवाजी!



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करून रयतेचे राजे झाले- प्रा.एम.बी.सावंत

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शिवाजी महाराजांनी चांगले राज्य सर्व धर्मांचा आदर आणि लोकांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण करून स्वराज्याची स्थापना केली व खऱ्या अर्थाने महाराज रयतेचे राजे झाले असे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते मा.प्रा. एम.बी.सावंत यांनी केले.

ते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात घेण्यात आलेल्या शिवजयंतीच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ.बी.टी. निकम तसेच कार्यक्रम अधिकारी, प्रा.जगदीशचंद्र मुळीक, प्रा.उत्तम सावंत,तसेच प्रा.श्रीकांत पवार, प्रा.नितीन देशपांडे, प्रा.राजेंद्र



साठे,प्रा.पुष्पा सस्ते, ग्रंथपाल प्रा.दिलीप शिंदे हे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नातेपुते शहरात घोषणाबाजी करत पदयात्रा काढून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर ऑनलाइन प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. तसेच महाविद्यालयातील साक्षी झेंडे व मनीषा येडगे यांनी शिवराया विषयी आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.उत्तम सावंत यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.पुष्पा सस्ते व आभार प्रा.श्रीकांत पवार यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# शाश्वत शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए.आय) वापर याविषयी व्याख्यान संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरांतर्गत मौजे रानमसले ता. उत्तर सोलापूर येथे "शाश्वत शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर" याविषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. भगवान सूर्यवंशी (कृषी सल्लागार व मार्गदर्शक, फायलो प्रायव्हेट लिमिटेड बंगळूरु) व अतुल जाधव (समन्वयक, फायलो प्रायव्हेट लिमिटेड बंगळूरु) हे लाभले होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी उपस्थित ग्रामस्थांना शाश्वत शेती म्हणजे काय व त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा फायदेशीर आहे याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी सांगितले की



शाश्वत शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर केल्याने संसाधनांची बचत, पर्यावरणाचे रक्षण आणि उत्पादनात वाढ होते. याद्वारे अचूक शेतीमध्ये सॅटेलाईट इमेज आणि ड्रोनच्या मदतीने शेतातील मातीचा दर्जा, ओलावा आणि पिकांची वाढ तपासली जाते. यामुळे संपूर्ण शेतात खते किंवा पाणी न वापरता जिथे गरज आहे तिथेच वापर करणे शक्य होते. एआय सेन्सर्स जमिनीतील ओलावा आणि हवामानाचा अंदाज घेऊन पिकांना नक्की कधी आणि किती पाण्याची गरज आहे हे ठरवतात. यामुळे २५% पर्यंत पाण्याची बचत होऊ शकते. पिकांवरील रोगांची सुरुवातीच्या काळातच ओळख पटवण्यासाठी एआय आधारित इमेज प्रोसेसिंगचा वापर महत्वपूर्ण ठरतोय. यामुळे कीटकनाशकांचा अनावश्यक वापर कमी करण्यासाठी मदत होऊ शकते.

जमिनीतील पोषक तत्वांच्या कमतरतेचे विश्लेषण करून नेमकी कोणती खते किती प्रमाणात वापरावीत, याचे अचूक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञानामुळे मिळणे शक्य झाले आहे. ग्रामस्थांनी शाश्वत शेती व ए आय संबंधित विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती बिडवे व बुशरा शेख यांनी केले. या कार्यक्रमास लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रा. आशिष सरकाळे, प्रा. वर्षा मानेदेशमुख, सर्व रानमसले ग्रामस्थ तसेच रासेयो स्वंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावचे सरपंच मनोहर क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार, सर्व रानमसले ग्रामपंचायत सदस्य, लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व रासेयो स्वयंसेवकांनी मोलाची भूमिका पार पाडली.

# एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासन कटिबद्ध - मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** एसटीच्या सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. लवकरच फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत देण्यात येणारा वेतन वाढीचा थकीत हप्ता कर्मचाऱ्यांच्या बॅंक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच या अनुषंगाने येत्या २४ फेब्रुवारीला काही कामगार संघटनांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वाढीच्या थकीत हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे पैसे नसल्यामुळे शासनाने ती जबाबदारी उचलावी. अशी चर्चा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी केली होती. त्यानुसार त्यांच्या अनुमतीने दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये शासनाने अनुदान स्वरूपात एसटीला देण्याचे बैठकीमध्ये ठरले होते.

थकीत हप्ते डिसेंबर महिन्याच्या वेतनासोबत देण्यास सुरुवात झाली. तथापि, काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत सदर हफ्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे थकीत हप्ता न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याची भावना एसटी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होऊन त्यांच्यात नाराजी पसरली. अशा परिस्थितीत काही कामगार संघटनांनी आंदोलनाच्या पवित्रा घेतला होता. ही गंभीर परिस्थिती ओळखून परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्री यांचीशी चर्चा करून या थकीत हप्त्यापोटी २१० कोटी रुपये तातडीने सरकारने एसटीला द्यावेत, अशी विनंती केली. यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. त्यामुळे त्या २१० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये आज शासनाने दिले असून उर्वरित निधी देखील लवकरच प्राप्त होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाचे हप्ते कोणते परिस्थितीमध्ये देण्यात येतील, असे आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शासनाच्या वतीने दिले आहे.

त्याचप्रमाणे, सध्या दहावी व बारावीच्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे त्यांच्या प्रवासात कोणते अडथळा निर्माण होऊ नये यासाठी काही संघटनांनी पुकारलेले आंदोलन तातडीने स्थगित करावे, असे देखील आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

## वात्रटिका

### मतलब आहे चोहीकडे

तोंयात राहू नये कोणी
दिवस बदलत असतात...
कायम आपले कोणीच नाही
तेही थोडे मतलबी दिसतात...
फोडाफोडी नंतर आता
फुटाफुटी सुद्धा झाली...
आधी बाप चोरला म्हणे
आता भावाची पण चोरी केली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमात न्या. एम.एस.जावळकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश न्या. एम. एस. जावळकर (नागपूर खंडपीठ) यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या पुढाकारातून आयोजित संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या राज्यव्यापी उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधानाबद्दल सखोल ज्ञान, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूर येथील डॉ. कैलास वसावे, डॉ. दिविता कोटेकर, डॉ. आरती तायडे, डॉ. व्ही. पी. तिवारी तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई येथील डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. अमोल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

न्या. श्रीमती एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

या विशेष सत्रात न्या. आर. सी. चव्हाण, न्या. पृथ्वीराज चव्हाण, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी आयुक्त समाज कल्याण इ. झेड. खोब्रागडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाल अ. थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे राज्यातील विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.

# भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यावर ॲड. अश्विनी कुलकर्णी यांचे व्याख्यान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर बार असोसिएशन तर्फे आयोजित विधी व्याख्यानमालेचे १३वे पुष्प बार असोसिएशन हॉलमध्ये उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख वक्त्या ॲड. अश्विनी कुलकर्णी यांनी भ्रष्टाचार निवारण अधिनियम १९८८ या विषयावर वकिलांना सखोल मार्गदर्शन केले.

ॲड. कुलकर्णी यांनी आपल्या व्याख्यानात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील विविध कलमे, तपास यंत्रणांची कार्यपद्धती, न्यायालयीन प्रक्रिया तसेच पुराव्यांचे स्वरूप यावर प्रकाश टाकला. सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा संदर्भ देत प्रत्यक्ष खटल्यांमध्ये उद्भवणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपायांची त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. वकिलांनी हा कायदा हाताळताना कोणती विशेष काळजी घ्यावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव व सहसचिव ॲड. मीरा प्रसाद यांच्या हस्ते वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. खजिनदार ॲड. अरविंद देडे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला, तर सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले.

या व्याख्यानास माजी अध्यक्ष ॲड. विजय शिंदे, ज्येष्ठ वकील विनोदकुमार दरगड, ॲड. संजय गायकवाड, ॲड. मल्लिनाथ पाटील, ॲड. रोहिदास पवार, ॲड. परवेज ढालायत आदींसह अनेक वकील बांधव उपस्थित होते.

# 'एआय भय नव्हे, भविष्य'; लोकशाहीकरण गरजेचे : मोदी

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):** एआय हे भय नव्हे तर भविष्य असल्याचे स्पष्ट करत पंतप्रधान मोदी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सर्वांसाठी खुली आणि लोकाभिमुख असली पाहिजे, असे ठामपणे सांगितले. नवी दिल्लीतील India AI Impact Summit 2026 च्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी 'मानव व्हिजन'ची घोषणा करत एआय ही मानव इतिहासातील परिवर्तनकारी शक्ती असल्याचे नमूद केले. मोदी म्हणाले, एआयचे लोकशाहीकरण झाले नाही तर मानव फक्त 'डेटा पॉईंट' किंवा कच्चा माल बनून राहण्याचा धोका आहे. एआय हे समावेशक आणि सक्षमीकरणाचे साधन बनले पाहिजे, विशेषतः ग्लोबल साऊथसाठी. त्यांनी एआयला 'ओपन स्काय' देण्याची गरज व्यक्त केली; मात्र त्याचवेळी मजबूत मानवी नियंत्रण आणि पारदर्शक देखरेखीची आवश्यकता अधोरेखित केली.

एआयचा योग्य वापर झाला तर गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण शक्य आहे; परंतु चुकीच्या वापरामुळे अस्थिरता निर्माण होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. २१व्या शतकातील एआय-आधारित जगात मानवकल्याणासाठी भारताची 'मानव व्हिजन' महत्त्वाची कडी ठरेल, असे ते म्हणाले.

### डीपफेकचा धोका; सुरक्षा उपायांची गरज

पंतप्रधानांनी डीपफेक आणि बनावट सामग्रीमुळे मुक्त समाजांना धोका निर्माण होऊ शकतो, असे सांगत प्रभावी सुरक्षा उपायांची आवश्यकता अधोरेखित केली. एआयचा वापर मानवकेंद्री ध्येयांपासून दूर गेला तर तो विनाशकारी ठरू शकतो, असा इशारा त्यांनी दिला. भारत एआयला प्रगतीची संधी म्हणून पाहतो, असे स्पष्ट करत त्यांनी एआयला जागतिक सार्वजनिक संपत्ती मानण्याचे आवाहन केले. तंत्रज्ञानाची देवाणघेवाण झाल्यास त्याचे फायदे अनेक पटींनी वाढतील, असे त्यांनी नमूद केले.

### जागतिक नेत्यांची उपस्थिती

समिटमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष Emmanuel Macron, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष Luiz Inacio Lula da Silva, श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष Anura Kumara Dissanayake, भूतानचे पंतप्रधान Tshering Tobgay, मॉरिशसचे पंतप्रधान Navin Ramgoolam, क्रोएशियाचे पंतप्रधान Andrej Plenkovic, सर्बियाचे राष्ट्राध्यक्ष Aleksandar Vucic, सेशेल्सचे उपराष्ट्राध्यक्ष Ahmed Afif, एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष Alar Karis आणि फिनलंडचे पंतप्रधान Petteri Orpo उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शिवतेज मंडळाच्या शिवजन्मोत्सवाला सुरुवात

## रक्तदान शिबिरात ३९ जणांचे रक्तदान



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** शिवतेज शिवजन्मोत्सव तरुण मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून शिवजन्मोत्सवाला उत्साहात सुरुवात करण्यात आली. याच वेळी आयोजित रक्तदान शिबिराचेही मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषद नूतन सदस्य श्रीमती विमल तानाजी खताळ, मोहोळ पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक बाजीराव पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य जयसिंग नाना अवताडे, अशोक अवताडे, सावळेश्वरचे सरपंच सखाराम साठेसर, माजी पंचायत समिती सदस्य कालिदास गावडे, कामती जिल्हा परिषद सदस्य अंकुश भैय्या अवताडे, अक्षय खताळ, प्रदीप आमले, लांबोटीच्या माजी सरपंच लक्ष्मी बंडू चट्टे पाटील, उपसरपंच नितीन चंदनशिवे, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत जाधव, नामदेव गोफने, सिद्धेश्वर सुळ गुरुजी, समाधान व्यवहारे, विलास शिंदे, उत्सव समिती अध्यक्ष अविराज चट्टे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, महेश शिंदे, आनंद व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य मोहन दाजी खताळ, माजी सरपंच पप्पू कदम, संजय शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उद्घाटनानंतर पार पडलेल्या रक्तदान शिबिरात एकूण ३९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

शिवजन्मोत्सवानिमित्त पुढील सहा दिवस विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रक्तदान शिबिरे, विद्यार्थ्यांना भाषणासाठी वह्या वाटप, व्याख्यानमाला तसेच कीर्तन कार्यक्रमांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर जाधव यांनी केले.

# मोहोळ तालुक्यात ७१ ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** तालुक्यातील तब्बल ७१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून ग्रामीण भागात राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांकडून तयारी सुरू झाली असून गावागावांत प्रचाराची रणनीती आखली जात आहे.

**निवडणूक जाहीर झालेल्या ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे :**

सावळेश्वर, सय्यद वरखडे, सौंदणे, कुरुल, पेनूर, चिंचोलीकाटी, घोडेश्वर, कामती खुर्द, अंकोली, कोरवली, भोयरे, नरखेड, पापरी, शेटफळ, आष्टी, देवडी, खंडाळी, पोखरापूर, कोळेगाव, चिखली, हिवरे, बिटले, गलांडेवाडी, वाघु, मनगुळी, बोपळे, एकुरके, घाटणे, वडवळ, आष्टे, मुंढेवाडी, पोफळी, हिंगणी (नि), लांबोटी, तेलंगवाडी, आंगर, आडेगाव, रामहिंगणी, सिद्धेवाडी, वडाचीवाडी, टाकळी (सि.), नजीकपिंपरी, येवती, खवणी, वरकुटे, शेजबाभुळगाव, तांबोळे, येणकी, कोथळे, मिरी,




वटवटे, औंढी, परमेश्वरपिंपरी, इंचगाव, वाघोली, पाटकुल, अर्जुनसोंड, भांबेवाडी, विरवडे खुर्द, येलमवाडी, मसले चौधरी, काटेवाडी, शिरापूर (मो.), ढोकबाभुळगाव, शिरापूर (सो.), दादापूर, हरळवाडी, जामगाव बु., शिंगोली तरटगाव, पिरटाकळी आणि नांदगाव.

निवडणूक कार्यक्रमानुसार अर्ज दाखल करणे, छाननी, माघार आणि मतदानाची तारीख लवकरच जाहीर होणार असून, तालुक्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. ग्रामपंचायत पातळीवरील या निवडणुका स्थानिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य कुंडली होणार डिजिटल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** पारधी समाजासह ४७ अनुसूचित जमाती प्रवर्गातील विविध जातींमधील असंख्य विद्यार्थी राज्यातील आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने आता प्रत्येक विद्यार्थ्याचे डिजिटल आरोग्य कार्ड (हेल्थ कार्ड) तयार करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची सविस्तर माहिती संकलित करून ती अंकीय (डिजिटल) प्रणालीमध्ये नोंदवली जाणार आहे. विद्यार्थी आणि त्याचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवून हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे.

आदिवासी प्रवर्गात महादेव कोळी, भील, पारधी, गोंड, वारली, कातकरी, कोकणा, कोरकू, कोलाम, आंध, बागा, बर्दा, बावचा, भैना, भरिया व तडवी भील आदी जातींचा समावेश होतो. या जमातींतील अनेक कुटुंबे डोंगराळ व दुर्गम भागात वास्तव्य करत असल्याने त्यांच्या मुलांना आश्रमशाळांमध्ये राहून शिक्षण घ्यावे लागते.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत कोणतीही समस्या उद्भवू नये यासाठी प्रत्येक आश्रमशाळेत सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जाणार आहे. तपासणीनंतर प्रत्येक विद्यार्थ्याला डिजिटल आरोग्य कार्ड वितरित करण्यात येईल.

सदर आरोग्य कार्ड तयार करताना आश्रमशाळेत नियुक्त आरोग्य सेविकेमार्फत विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्यविषयक माहिती डिजिटल स्वरूपात नोंदवली जाईल. या प्रणालीचे नियंत्रण आश्रमशाळा स्तरापासून विभागीय प्रकल्प अधिकारी, अप्पर आयुक्त तसेच आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तालय स्तरावरून केले जाणार आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

आदिवासी विभागाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत हा निर्णय उच्च स्तरावर घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहून त्यांचा शैक्षणिक विकास अधिक सक्षम होईल, असा विश्वास धनंजय झाकडे, प्रकल्प संचालक, विभागीय आदिवासी प्रकल्प कार्यालय यांनी व्यक्त केला.

# खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या संकल्पनेतून वैचारिक परिसंवाद व व्याख्यानमाला संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते–पाटील व सौ. शितलदेवी मोहिते–पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंतीनिमित्त वैचारिक परिसंवाद व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. 'शिवजयंतीला महापुरुषांची व्याख्याने व्हावीत' या संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी यावेळी करण्यात आली.



इतिहास विश्लेषक डॉ. दत्तात्रय मगर यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर शेती, व्यापार आणि पायाभूत सुविधांवर भर देत स्वराज्य आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या बळकट केले. किल्ले, रस्ते व सिंचन व्यवस्थेवर त्यांनी दिलेला भर हा आधुनिक विकासाचा पाया ठरला असे सांगितले.

शिवरत्न नॉलेज सिटी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा अकलूज, सिंहगर्जना ग्रुप व जाणीव मैत्री ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर इशिता मोहिते–पाटील, प्रा. सुहास उरवणे, डॉ. पांडुरंग नलवडे, प्रा. अनिल लोंढे, विक्रम वैद्य, डॉ. अमोल माने शेंडगे, अनिल जाधव, डॉ. विश्वनाथ आवड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. अनिल लोंढे यांनी महात्मा जोतिराव फुले यांनी १८७० साली शिवजयंतीची सुरुवात करून समाजजागृतीचा पाया रचल्याचा उल्लेख केला.प्रा. सुहास उरवणे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या 'अनुभव मंटप' या लोकशाही संकल्पनेवर प्रकाश टाकत समता, न्याय व सुशासनाच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. विश्वनाथ आवड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक संघषार्चा आढावा घेत समान हक्कांच्या लढ्याची आठवण करून दिली.विक्रम वैद्य यांनी गड–किल्ले संवर्धनाची गरज व्यक्त केली, तर अनिल जाधव यांनी तरुणाईला इतिहासाशी जोडण्यासाठी अशा वैचारिक उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विकासाभिमुख धोरणांपासून महात्मा फुले, महात्मा बसवेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व लोकशाही मूल्यांपर्यंत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नागनाथ साळवे यांनी केले.

# सहाय्यक आयुक्त खंदारे यांना निलंबित करा - संभाजी ब्रिगेड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजयंती उत्सव साजरा न करणाऱ्या व शिवप्रेमी जाब विचारणारे मावळ्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर येथील संबंधित जबाबदार महिला अधिकाऱ्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशा मागणीचे नियोजन संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले तसेच मुख्यमंत्री सामाजिक न्याय मंत्री व समाज कल्याण आयुक्त यांना सुद्धा ई–मेलद्वारे कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे अनिवार्य आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही, सोलापूर येथे एक अत्यंत संतापजनक प्रकार घडला आहे.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' निमित्त जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या शासकीय कार्यालयामध्ये शिवजयंती साजरी करण्यात आली नाही. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी आणि जाब विचारण्यासाठी गेलेल्या शिवभक्तांना सन्मानाची वागणूक देण्याऐवजी, तेथील कार्यालय प्रमुख महिला कर्मचाऱ्याने अत्यंत अरेरावीची भाषा वापरली, शिवीगाळ केली आणि जातीय द्वेष निर्माण होईल असे वर्तन केले.

भारतीय संविधानानुसार जातीभेद लिंगभेद याला थारा नाही

१. शासकीय आदेशाचा अवमानः संबंधित कार्यालयाने शासनाच्या अधिकृत परिपत्रकाचा भंग केल्याबद्दल त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई व्हावी.

२. अरेरावी व गैरवर्तनः शिवभक्तांशी अश्लाघ्य भाषेत बोलणाऱ्या आणि सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या संबंधित महिला कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित (र४२स्न्रील्ल्) करण्यात यावे.

३. फौजदारी कारवाईः शासकीय पदाचा दुरुपयोग करून जातीयवाद निर्माण केल्याप्रकरणी संबंधित महिलेवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे आराध्य दैवत आहेत. शासकीय खुर्चीवर बसून त्यांच्या जयंतीचा अवमान करणे आणि विचारणाऱ्या नागरिकांना अपमानित करणे, हे लोकशाहीत खपवून घेतले जाणार नाही.

तरी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल असा इशारा संभाजी ब्रिगेड च्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनलदास, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे, सोमनाथ मेनकुडले, संतोष मकानदार, सिताराम बाबर आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ही वीरांची शूर परिक्रमाची भूमी आहे - प्रा विकास शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र ही वीरांची शूर पराक्रमाची भूमी आहे आणि या मातीतच छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज जन्मले ही गौरवास्पद बाब आहे. असे मत प्रा विकास शिंदे यांनी मांडले. ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर स्वराज्य रक्षक संभाजी महाराज अध्यासन केंद्र व छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आर्ट्स अँड कॉमर्स सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने विशेष व्याख्यानामध्ये ते बोलत होते.



पुढे बोलताना ते म्हणाले की शिवचरित्रातून आपण सर्वांनी धाडस शूरवीर हे गुण आत्मसात केले पाहिजे. सतराव्या शतकात महाराष्ट्राची परिस्थिती ही अतिशय हालाखीची होती 1630 ला महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ होता अशा अवस्थेतच छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. या परिस्थितीत महाराष्ट्राला नेतृत्वाची गरज होती. आणि त्यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा अटकेपार झेंडा रोवला. स्वराज्याचे तोरण बांधताना छत्रपती शिवाजी महाराजांनी जिवाभावाचे मावळे गोळा केले व त्यांच्या सहकार्याने त्यांनी हिंदवी स्वराज्याची मुहूर्त मेट रोवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी जिथे घाम गाळला तिथे त्यांच्या विश्वासू मावळ्यांनी आपले रक्त सांडले हे आपण शिवचरित्रातून घ्यावी अशी मत मांडले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध पुतळ्याचे पूजन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन मोटे यांनी केले. प्रमुख पाहुण्याच्या परिचय प्रा.युवराज सुरवसे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा.सोनकांबळे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, ज्ञानेश्वर सपाटे, प्रा कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, प्रा वीरभद्र दंडे, प्रा अनिल घनवट, प्रा सचिन गायकवाड, प्रा नेताजी कोकाटे, महेश माने, शिवदास चटके,अशोक चव्हाण, नागनाथ नवगिरे, प्राचार्य मधुकर पवार, दत्ता भोसले, सुजाता जुगदार,मंजुश्री पाटील, उषा गोखळे, माधवी कांबळे, शिक्षक शिक्षकेतर उपस्थित होते.

# सिमेंट कंपनीतील १३२ केव्हीए ट्रान्स्फॉर्मरला भीषण आग; सुदैवाने जीवितहानी नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी परिसरातील ऊँ३३ल्र्ल्रं ऊील्ल३ कंपनीच्या १३२ केव्हीए ट्रान्स्फॉर्मरला गुरुवारी रात्री पावणेआठच्या सुमारास भीषण आग लागली. तातडीने अग्निशमन उपाययोजना राबविल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीत वीज वितरण कंपनीचा १३२ केव्हीएचा ट्रान्स्फॉर्मर आहे. गुरुवारी सायंकाळी अचानक ठिणगी उडून ट्रान्स्फॉर्मरला आग लागली. सुरुवातीला कंपनी प्रशासनाने आग विझविण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण केले. ज्वाळा आणि धुराचे लोळ दूरवरून दिसत होते. आगीची माहिती मिळताच एनटीपीसी कंपनी तसेच जयहिंद शुगर कंपनीकडून पाण्याचे बंब मागविण्यात आले. जवानांनी पाण्याचा जोरदार मारा करत सुमारे दोन ते अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविले. ही माहिती वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी दिली.

आग नेमकी कशामुळे लागली आणि त्यात किती आर्थिक नुकसान झाले याची अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध नाही. मात्र, कोणतीही जीवितहानी न झाल्याने मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

# पंचायत समितीत भाजपची खिलारेंना गटनेतेपदाची संधी



**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :-** मोहोळ तालुका पंचायत समितीच्या भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी संजीव माणिक खिलारे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष, भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार राजन पाटील यांनी ही घोषणा केली.

कृषी उत्पन्न बाजार समिती, मोहोळ येथे आयोजित बैठकीत नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते. या बैठकीत पंचायत समिती सभागृहातील गटनेता निवडीचे सर्वाधिकार राजन पाटील यांना देण्यात आले. त्यानंतर त्यांनी संजीव खिलारे यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली.

संजीव खिलारे हे पक्षातील चळवळीतील अभ्यासू व लढाऊ कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांना गटनेतेपदाची संधी देण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. समाजातील विविध स्तरातून त्यांच्या निवडीचे स्वागत होत असून, आगामी काळात पंचायत समितीमध्ये पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे मांडली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश चवरे, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, मोहोळ शहर व तालुका पूर्व अध्यक्ष सतीश (आप्पा) काळे, मोहोळ दक्षिण तालुका अध्यक्ष रमेश माने, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष मुजीब मुजावर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अंकुश (भैय्या) आवताडे, मोहोळ नगरपरिषद उपनगराध्यक्ष दत्ता खवळे, नगरसेवक सुशील (भैय्या) क्षीरसागर यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य लखन शिंदे, बालाजी नरुटे तसेच पंचायत समिती सदस्य अस्लम चौधरी, सौ. उल्का पाटील, सौ. पार्वती गावडे, सौ. निलम मसलकर, सौ. कोमल आवताडे, सौ. अमिरिका कापसे, अक्षय खताळ आदी उपस्थित होते.

तसेच माजी नगरसेवक संतोष सुरवसे, अण्णा फडतरे, मंगेश गुंड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

संजीव खिलारे यांनी निवडीनंतर बोलताना, 'पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी प्रयत्नशील राहीन. मोहोळ तालुक्याच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सभागृहात प्रभावीपणे आवाज उठवू,' अशी ग्वाही दिली.

मोहोळ पंचायत समितीत भाजपच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवड महत्त्वाची मानली जात आहे.

# शिवाजी महाराजांनी मुक्काम केलेल्या मंगळवेढा किल्ल्यात 'इको फ्रेंडली क्लब'ची ऐतिहासिक सहल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण आणि वारसा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या इको फ्रेंडली क्लबच्या वतीने यंदाची शिवजयंती अतिशय आगळ्यावेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरी करण्यात आली. ज्या भूमीवर खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांचे सात दिवस वास्तव्य लाभले, त्या ऐतिहासिक मंगळवेढा भुईकोट किल्ल्याची सफर इको फ्रेंडली क्लबने घडवून आणली.



सन 1665 च्या विजापूर मोहिमेदरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी मंगळवेढा किल्ल्यात सात दिवस मुक्काम केला होता. या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणाऱ्या किल्ल्याची माहिती नवीन पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या विशेष सहलीमध्ये सहभागी शिवभक्तांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणांनी संपूर्ण किल्ला परिसर दणाणून सोडला होता.

इतिहास अभ्यासक प्रकाश मुळीक यांनी यावेळी उपस्थित सदस्यांना मंगळवेढा किल्ल्याचे महत्त्व आणि महाराजांच्या वास्तव्याचा सविस्तर इतिहास सांगितला.

शिवभक्तांनी मंगळवेढा किल्ल्यासोबतच संत दामाजी मंदिर, श्री रिद्धी सिद्धी महागणपती मंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर आणि माचणूर येथील श्री सिद्धेश्वर मंदिर या पर्यटन स्थळांनाही भेटी देऊन दर्शन घेतले.

या उपक्रमाचे आयोजन इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक परशुराम कोकणे, समन्वयक अजित कोकणे आणि संतोष तडवळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. या ऐतिहासिक सफरीत गिरीश घोगले, उमा घोगले, योगिता चाबुकस्वार, अस्मी चाबुकस्वार, गंगुबाई कोकणे, सरस्वती कोकणे, आराध्या कोकणे, डॉ. सिद्धार्थ तळभंडारे, विजय राठोड, चंद्रशेखर गुंजले, शशिकला गायकवाड, प्रणाली कडगंची, गणेश लोणी, ऋषिकेश जावळे आदी सदस्य उत्साहाने सहभागी झाले होते.

# शिवजयंती व शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅग वाटप

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह उदयसिंह मोहिते–पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २० फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद मुला–मुलींची शाळा नंबर ३ व १ मधील १०२ विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप अकलूज नगरपरिषदचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते–पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



या स्तुत्य उपक्रमाचे संयुक्त आयोजन नगरसेवक मोहसिन शेख व नगरसेवक अझरुद्दीन शेख यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमप्रसंगी नगरसेविका मंदाकिनी पाडोळे, नगरसेवक सचिन देशमुख, लखन गायकवाड, प्रदेश अल्पसंख्याक सरचिटणीस मुख्तारभाई कोरबू, सोलापूर जिल्हा अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष साजिद सय्यद, माजी ग्रामपंचायत सदस्य अन्वरहुसेन बागवान, शंकरनाना गायकवाड, रफीअहमद कोरबू, इर्शाद काझी, रफिक पठाण, शकील मुलाणी सर, हसन बागवान, डॉ. फैज सय्यद, शालेय समितीचे चंदन कोतमिरे, मोहिद्दीन शेख, फारुक शेख, इन्नूसबाबा सय्यद, अल्ताफ मुलाणी, शोएब बागवान, जुनेद कोरबू, फरीद बागवान शाळेचे शिक्षक–शिक्षिका आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावणारा हा उपक्रम उत्साहात आणि आनंदात पार पडला.